# निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा
# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत
# कृषि तंत्र पदविका (दोन वर्षे) अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया २०२४-२५

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी अंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरिता कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विद्यापीठस्तरावरुन ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे.

**अभ्यासक्रम व प्रवेश पात्रता :-**

| अ.क्र. | प्रवेशाचे वर्ष | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | पहिले | कृषि तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण |

यासाठी प्रवेश माहिती पुस्तिका प्रवेश अर्जासह https://vnmkvdiplomaadmission.com संकेतस्थळावर दिनांक १०.०६.२०२४ पासून उपलब्ध करून देण्यात येईल.

**प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी अवलंबवावयाची कार्यपध्दती :-**

उमेदवारांने https://vnmkvdiplomaadmission.com या संकेतस्थळाद्वारे दिनांक १०.०६.२०२४ ते ०६.०७.२०२४ या कालावधीत ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. या कालावधीनंतर प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध नसेल.ऑनलाईन प्रवेश अर्ज भरतांना उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र, उमेदवाराची स्वाक्षरी, आवश्यक ती संबंधीत मुळ कागदपत्रे स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड करावीत.प्रवेश अर्ज किंवा कागदपत्रे हातबटवडयाने / टपालाने / कुरीअरने पाठवू नयेत. प्रवेश अर्ज भरतेवेळी प्रवेश अर्जाचे शुल्क ऑनलाईन पध्दतीने डेबीट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा नेट बँकिंग किंवा युपीआय द्वारे भरावे. प्रवेश अर्ज भरण्यापुर्वी प्रवेश माहिती पुस्तिका व सोबत दिलेली परिशिष्टे काळजीपुर्वक वाचावीत.प्रवेश अर्ज दाखल करण्यासाठी भरावयाचे शुल्क :-खुल्या प्रवर्गासाठी रू.४०० व आरक्षीत प्रवर्गासाठी रू.२००/- (अ.,जा., अ.ज., वि.जा.*, भ.ज. *, इ.मा.व.*,एसईबीसी.*, इडब्ल्युएस*) {* उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र अनिवार्य }

*स्वाक्षरीत*

**कुलसचिव**
**वसंतराव नाईक मराठवाडा**
**कृषि विद्यापीठ, परभणी**

क्रमांकः
दिनांक. /०६/२०२४